माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : १७०९/२०२२**

**अपिलार्थी, श्री.आकाश बाळाकृष्ण मोहोड,**
**मु.मधलापुर, पो.म्हैसपुर, ता.भातकुली, जि.अमरावती.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्रामपंचायत बोरखडी खुर्द, ता.भातकुली, जि.अमरावती.**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, भातकुली, ता.भातकुली, जि.अमरावती.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०५.०३.२०२५.**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपील अर्ज दाखल दिनांक | प्रथम आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०२.२०२२ | -- | २४.०३.२०२२ | १३.०४.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. **१०.०५.२०२२** रोजीच्या अर्जान्वये "*माहिती मिळाली नाही.*" असे कारण नमूद करुन कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०५.०३.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.आकाश बाळकृष्ण मोहोड हे अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी कु.वंदना गोपाळे, सचिव ह्या उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.तुषार दांडगे, गट विकास अधिकारी हे उपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.नितेश ग.पंडीत व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी श्री.प्रफुल्ल भोरखडे, गट विकास अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०७.०१.२०२२** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " *माहे फेब्रुवारी, २०२२ च्या महिण्याच्या मासिक मिटींग ला प्रोसेडिंग बुक वर कोणकोणते ठराव घेण्यात आले व किती सदस्यांची मंजुरी होती व हजेरी पुस्तकाची छायांकीत प्रत*' मागितलेली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक २४.०३.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "*माहिती मिळाली नसल्यामुळे*" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय सत्यमेव जयते अमरावती विभाग, अमरावती

केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १३.०४.२०२२ रोजी सुनावणी घेऊन "*जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती अपिलकर्ता यांना सात दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.*" असे नमूद करुन आदेश पारीत केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलकर्ता यांना दि.१२.०७.२०२२ रोजी माहिती देण्यात आली. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना माहिती पाठविलेल्या पत्राची प्रत व अपिलकर्ता यांचे स्वाक्षरीची प्रत सादर केली आहे. सबब, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (१०) नूसार खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१ अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०५.०३.२०२५**

जावक क्रमांक 9994 दिनांक 23 APR 2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती